**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर सात टक्के राहण्याचा रिझर्व्ह बँकेचा अंदाज
- राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेच्या गुणपत्रिका आणि इतर संबंधित प्रमाणपत्राचं वाटप येत्या सोमवारी
- फलाटांचं रुंदीकरण आणि विस्ताराच्या कामासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि ठाणे रेल्वे स्थानकांत आज मध्यरात्रीपासून विशेष मेगा ब्लॉक / ९५६ उपनगरी फेऱ्या आणि ७२ मेल-एक्स्प्रेस खंडित
- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातला प्रचार थंडावला

  **आणि**
- नैर्ऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल / विदर्भ आणि कोकणातल्या काही भागात उष्णतेची लाट

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था सात टक्के दरानं वाढेल, असा अंदाज वर्तवला आहे. रिझर्व्ह बँकेनं आज चालू आर्थिक वर्षाचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीतील मध्यवर्ती बँकेच्या कामकाजाचा समावेश केला आहे.

१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था गतिमान आणि अधिक मजबूत झाल्याचं रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालात नमूद केलं आहे. यामुळे जीडीपीतही वाढ झाली असून तो ७

पूर्णांक ६ दशांश टक्के इतका झाला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात जीडीपी दर ७ टक्के इतका होता. सलग तीन वर्षे जीडीपीचा दर सात टक्के किंवा त्याहून अधिक आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या बारावीच्या परीक्षेच्या गुणपत्रिका आणि इतर संबंधित प्रमाणपत्राचं वाटप येत्या सोमवारी केलं जाणार आहे.

विभागीय मंडळांकडून सोमवारी सकाळी कनिष्ठ महाविद्यालयांना गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, तपशिलवार गुण दर्शवणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख दिली जातील. त्यानंतर दुपारी तीन वाजता विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयांतून या सर्व प्रमाणपत्रांचं वाटप केलं जाईल. या संदर्भातील परिपत्रक राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्ध केलं आहे.

**<><><><>**

मुंबईत मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि ठाणे रेल्वे स्थानकांत प्लॅटफॉर्मचं रुंदीकरण आणि विस्ताराच्या कामासाठी आज मध्यरात्री पासून विशेष मेगा ब्लॉक घेतला जाणार आहे. हे काम रविवारी दुपारपर्यंत चालणार आहे. रुंदीकरणाच्या कामासाठी ठाणे इथं ६३ तासांचा तर सीएसएमटी स्थानकात ३६ तासांचा मेगा ब्लॉक घेतला जाणार आहे.

मेगा ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या २३ टक्के, म्हणजे एकूण ९५६ लोकल फेऱ्या आणि ७२ मेल-एक्स्प्रेसची वाहतूक खंडित होणार आहे. अनेक लांब पल्ल्यांच्या काही गाड्या रद्द केल्या आहेत तर कोकणात जाणाऱ्या आणि येणाऱ्या गाड्या पनवेल स्थानकातून सुटतील. उपनगरीय रेल्वे फेऱ्या अंशतः रद्द केल्या जाणार

आहेत. शनिवारी, १ जून रोजी रविवारच्या वेळापत्रकानुसार उपनगरी गाड्या चालवण्यात येणार आहेत. यामुळे रेल्वे स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी शक्य असल्यास रेल्वे प्रवास टाळा, असं आवाहन मध्य रेल्वे प्रशासनानं केलं आहे. हे काम पायाभूत सुविधांच्या सुधारणा आणि फायद्यासाठी आवश्यक असल्यानं प्रवाशांनी सहकार्य करावं, अशी विनंती मध्य रेल्वे प्रशासनानं केली आहे.

**<><><><><>**

मराठवाड्यात भीषण दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे जनावरांना दावणीपर्यंत चारा उपलब्ध करून द्यावा, शेतकऱ्यांना कर्जमुक्त  करावं, बँकाकडून सुरू असलेली कर्जवसुली थांबवावी, अशी मागणी विधानसभेतले विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. काँग्रेसनं राज्यात काढलेल्या दुष्काळ पाहणी दौऱ्यावर असताना छत्रपती संभाजीनगर इथं ते बातमीदारांशी बोलत होते. शेतकऱ्यांना मोफत वीज, बियाणे, खते उपलब्ध करून द्यावेत, असं ते म्हणाले. मराठवाड्यात दुष्काळ पडलेला असताना राज्याचे कृषीमंत्री परदेश दौऱ्यावर जातात, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं छायाचित्र फाडून त्यांचा अपमान केला असल्याचा आरोप करत, अव्हाड यांच्या विरोधात भारतीय जनता युवा मोर्चानं आज मुंबईत जोडे मारो आंदोलन केलं. आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी आंदोलकांनी केली.

रिपब्लिकन पक्षानं आज मुंबईत चैत्यभुमी इथं जितेंद्र आव्हाड यांचं छायाचित्र जाळून निषेध केला. आव्हाड यांच्यावर कडक कारवाई व्हावी यासाठी रिपब्लिकन

पक्ष राज्यभर निषेध आंदोलन करणार असल्याचं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितलं.

दरम्यान, याप्रकरणी जितेंद्र आव्हाड यांच्याविरुद्ध पुण्यात बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

हिवरे बाजार इथलं लोकसहभागाचं मॉडेल बेल्जीयममध्ये राबवणार असल्याचं, बेल्जीयम मधल्या गेमबलॉस युनिव्हर्सिटी मधल्या ग्रामविकास विभागाचे डॉ.नाश्तासिहा गुमोचडिया यांनी म्हटलं आहे. २८ मे रोजी हिवरे बाजार इथं दिलेल्या भेटी नंतर ते बोलत होते. पद्मश्री पुरस्कार प्राप्त पोपटराव पवार यांनी यावेळी हिवरे बाजार गावातल्या सर्व विकास कामांची माहिती दिली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार आज संध्याकाळी थंडावला. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघात येत्या शनिवारी मतदान होणार आहे. त्यात बिहारमधल्या ८, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडच्या ३, ओदिशातल्या ६, पंजाबमधल्या सर्व १३, उत्तरप्रदेशातल्या १३, पश्चिम बंगालमधल्या ९, आणि चंडीगढमधल्या एका जागेचा समावेश आहे. या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार नशीब आजमावत आहेत.

ओदिशा विधानसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदानही येत्या शनिवारी होणार असून त्या ४२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होईल. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि

देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजी होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २ जून रोजी होणार आहे.

<><><><>

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांतल्या जलसाठ्यात घट झाल्यानं मुंबई महानगरात आजपासूनच पाच टक्के पाणीकपात करत असल्याचं मुंबई महानगरपालिकेनं जाहीर केलं आहे. ही कपात बुधवार, ५ जून पासून १० टक्के असेल असंही पालिका प्रशासनानं सांगितलं आहे.

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या जलाशयांतील पाणी पाऊस पडेपर्यंत पुरावे यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून ही कपात लागू केल्याचं सांगत नागरिकांनी पाणी जपून वापरावं, असं आवाहनही पालिकेनं केलं आहे.

<><><><>

काँग्रेस आणि इंडिया आघाडीनं नेहमीच स्वार्थ आणि मतपेढीचं राजकारण केल्याची टीका  प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी केली आहे. ते आज पंजाबमध्ये होशियारपूर इथं पक्षाच्या  प्रचार सभेला संबोधित करत होते. काँग्रेसनं केवळ स्वार्थापोटी राममंदिराच्या उभारणीला सातत्यानं विरोध केला असून आता हा पक्ष  नागरिकत्व सुधारणा कायद्यालाही विरोध करत असल्याचं ते यावेळी म्हणाले. दलित, ओबीसी आणि मागास वर्गीयांचं आरक्षण कोणीही हिसकावून घेऊ शकत नाही,  याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

<><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज सलग पाचव्या सत्रात घसरण झाली. त्यामुळं सेन्सेक्स ७४ हजारांच्या पातळीखाली जाऊन बंद झाला निफ्टीनंही २२ हजार

५०० ची पातळी तोडली.  सुरुवातीपासून सुरु असलेली घसरण व्यवहार संपेपर्यंत वाढत गेली. त्यामुळं दिवसअखेर सेन्सेक्स ६१७ अंकांनी घसरुन ७३ हजार ८८६ अंकांवर बंद झाला तर निफ्टी २१६ अंकांची घसरण नोंदवुन २२ हजार ४८९ अंकांवर स्थिरावला. यामुळं गुंतवणूकदारांचं पावणे ४ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं. बँकांच्या समभागातल्या तेजीमुळं निफ्टी बँक मात्र आज १८१ अंकांच्या तेजीनं बंद झाला.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यात २४ ते २६ मे दरम्यान वादळी वारा आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाचे शासनानं तात्काळ पंचनामे करावेत आणि शेतकरी कुटुंबांना मदत करावी अशी मागणी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे. ते आज धाराशिव जिल्ह्यातल्या सांगवी, कामेगाव, दाऊपूर, भंडारवाडी या भागाला दिलेल्या भेटीनंतर बोलत होते. शासनानं निकष बाजूला ठेवून मदत करण्याची गरज असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून आपल्या १ जून या नेहमीच्या वेळेपूर्वीच दोन दिवस दाखल झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तामिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह, ईशान्य भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं. **<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, राज्याच्या उर्वरीत भागात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

मुंबईसह पालघर, ठाणे, रायगड, जिल्ह्यात पुढले दोन दिवस उष्णतेची लाट राहील असा अंदाज असून, या ठिकाणी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर भंडारा, गोंदिया, नागपूर, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**//<><><><><>//**